पालघर जिल्ह्यातील पूर, दरड व भूकंप धोके सौम्यिकरण उपाययोजनेंतर्गंत करावयाच्या कामांसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक -:आव्यप्र-२०१९/प्र.क्र.१११/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई, ४०० ०३२.
दिनांक -: २६ .०४ .२०१९

शासन निर्णय :

पालघर जिल्हयातील डहाणू व तलासरी तालुक्यात भूकंपाचे धक्के बसत असल्याने या तालुक्यातील ग्रामस्थांना ताडपत्री उपलब्ध करण्यासाठी रुपये २०,००,०००/- (रुपये वीस लाख फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीव्दारे (BDS) जिल्हाधिकारी, पालघर यांना वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

कार्यासन अधिकारी (म-११) यांनी सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे (BEAMS) सदर निधी जिल्हाधिकारी, पालघर यांना वितरीत करावा.

वितरीत करण्यात आलेला निधी सन २०१९-२० या वित्तीय वर्षात खर्च करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात यावे.

या कामी होणारा खर्च मागणी क्र.सी-६, २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ८०, सर्वसाधारण, ८०० इतर खर्च (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या माणकानुसार खर्च (९१) (०१) शोध, बचाव कार्य व लोकांना सुरक्षीत स्थळी हलविण्यासाठी आपत्तीच्या प्रतिसादासाठी (संपर्क साधनासह) खरेदी करावयाची साधनसामुग्री (आपत्ती प्रतिसाद निधीच्या ५ टक्के मर्यादेपर्यंत) २२४५ २४९९ अंतर्गत ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५०२१२५७०६९५१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.05.02 13:00:27 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) जिल्हाधिकारी,पालघर
२) महालेखाकार, महाराष्ट्र - १ ,मुंबई
३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
४) वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग ,मंत्रालय ,मुंबई
५) लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग ,मंत्रालय ,मुंबई ६) निवड नस्ती